# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** दि. १२ में २०२० च्या केंद्रिय प्रदुषण नियंत्रण मंडळाचे **{घनकचरा व्यवस्थापन विभाग}** मार्गदर्शक तत्वाचे तसचे मा. उच्च न्यायालय यांचे निर्देशाची नागपूर मनपा क्षेत्रात अंमलबजावणी करण्याकरीता खालिल प्रमाणे धोरण निश्चित केले आहे.

१) नागपूर मनपा क्षेत्रातील जे मुर्तीकार, कारागीर, व उत्पादक केवळ पर्यावरण पुरक नैसर्गिक सामुग्रीचा वापर करून मुर्तीची निर्मिती करणार अशा मुर्ती कारागीरांना परवाना मंजुरी करणे. तसेच जे मुर्तीकार प्रतिदिन १०० पेक्षा जास्त मुर्ती तयार करतात त्या निर्मात्यांना मनपा मध्ये नोंदणी करणे बंधनकारक आहे. अशा संबधीत व्यवसायीका कडून नोंदणी शुल्क रू. ५००/— व अनामत रक्कम ५०००/— स्वीकृत करून नोंदणी करणे आवश्यक आहे.

२) पर्यावरण पूरक मुर्तीचे विसर्जन करण्याकरीता मुर्तीच्या उंचीची मर्यादा सार्वजनीक मंडळाकरीता ४ फुट x ४ फुट आकाराची तसेच घरघुती मुर्ती करीता २ फुट x २ फुट आकाराची मर्यादा निश्चित करणे.

३) मुर्तीचे विसर्जन सुरक्षित होण्याकरीता पुजा आयोजक कमेटीची नोंदणी मनपा मध्ये करणे.

४) अवैध व विना परवाना मुर्तीची निर्मिती, भांडारण, वापर व विक्री करीत असल्यास तसेच मार्गदर्शक तत्वाची उल्लघंन केल्यास रू. १००००/— दंड/शास्ती आकारण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

५) मुद्या क्र. १ ते ४ नुसार अंमलबजावणी करण्याचे संपूर्ण अधिकार क्षेत्रिय कार्यालयाचे मुख्य स्वच्छता अधिकारी, कार्यकारी अभियंता, सहा. आयुक्त तसेच त्यावरिल वरिष्ठ अधिकारी यांना अधिकार प्रदान करणे

करीता वरील धोरणाची नागपूर मनपा क्षेत्रात अंमलबजावणी करण्याकरीता सदरचा प्रस्ताव मा. प्रशासक यांच्या मान्यतेस सादर प्रस्तुत.

(टिप:— सविस्तर माहिती नस्ती मध्ये उपलब्ध आहे.)

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- ३१/मनपा/प्रशासक** **दिनांक :- ०१/०७/२०२२**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त तथा संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार दि. १२ में २०२० च्या केंद्रिय प्रदुषण नियंत्रण मंडळाचे मार्गदर्शक तत्वाचे तसचे मा. उच्च न्यायालय यांचे निर्देशाची नागपूर मनपा क्षेत्रात अंमलबजावणी करण्याकरीता खालिल प्रमाणे धोरण निश्चित केले आहे.

१) नागपूर मनपा क्षेत्रातील जे मुर्तीकार, कारागीर, व उत्पादक केवळ पर्यावरण पुरक नैसर्गिक सामुग्रीचा वापर करून मुर्तीची निर्मिती करणार अशा मुर्ती कारागीरांना परवाना मंजुरी करणे. तसेच जे मुर्तीकार प्रतिदिन १०० पेक्षा जास्त मुर्ती तयार करतात त्या निर्मात्यांना मनपा मध्ये नोंदणी करणे बंधनकारक आहे. अशा संबधीत व्यवसायीका कडून नोंदणी शुल्क रू. ५००/— व अनामत रक्कम ५०००/— स्वीकृत करून नोंदणी करणे आवश्यक आहे.

२) पर्यावरण पूरक मुर्तीचे विसर्जन करण्याकरीता मुर्तीच्या उंचीची मर्यादा सार्वजनीक मंडळाकरीता ४ फुट x ४ फुट आकाराची तसेच घरघुती मुर्ती करीता २ फुट x २ फुट आकाराची मर्यादा निश्चित करणे.

३) मुर्तीचे विसर्जन सुरक्षित होण्याकरीता पुजा आयोजक कमेटीची नोंदणी मनपा मध्ये करणे.

४) अवैध व विना परवाना मुर्तीची निर्मिती, भांडारण, वापर व विक्री करीत असल्यास तसेच मार्गदर्शक तत्वाची उल्लघंन केल्यास रू. १००००/— दंड/शास्ती आकारण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

५) मुद्या क्र. १ ते ४ नुसार अंमलबजावणी करण्याचे संपूर्ण अधिकार क्षेत्रिय कार्यालयाचे मुख्य स्वच्छता अधिकारी, कार्यकारी अभियंता, सहा. आयुक्त तसेच त्यावरिल वरिष्ठ अधिकारी यांना अधिकार प्रदान करणे

करीता वरील धोरणाची नागपूर मनपा क्षेत्रात अंमलबजावणी करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**